Lalita Gandbhir
4200 N. Ocean Dr.
1501-2
Riviera Beach, FL 33404
U.S.A

# जूरी ड्यूटी

मला कोर्टातून एक पत्र आलं. उघडलं, तर त्यात जूरी ड्यूटीचं आमंत्रण होतं. मी खूष झाले.

कधी एकेकाळी मी एक सिनेमा पाहिला होता. त्यात निष्पाप पुरुषावर खुनाचा आळ येतो असे दाखविले होते. समाज, वर्तमानपत्र सर्वच त्याला दोषी ठरवतात. खटला संपतो. अशावेळी एक हुशार जूरर पुराव्याचा काळजीपूर्वक अभ्यास करतो व आरोपी निर्दोष कसा आहे हे जूरीला पटवून देतो. सिनेमात हा प्रसंग अत्यंत उत्तम रीतीने चित्रित केला होता आणि तो माझ्या मनावर ठसला.

त्या सिनेमाच्या प्रभावामुळे, कधी ना कधी मलाही जूरी ड्यूटीला बोलावणं येईल व मीसुद्धा 'आरोपीने गुन्हा केला नाही' हे सर्वांना पटवून देईन, अशी स्वप्नं मी पहिली होती.

प्रत्यक्षात मला दोनदा जूरी ड्यूटीसाठी बोलावणं आलंही. 'सकाळी ७ ते ८ वाजता कोर्टात यायचं का नाही हे सांगायला फोन करू' असा निरोपही आला. मात्र दोन्ही वेळा 'येण्याची जरूरी नाही' असा फोन आला आणि माझी निराशा झाली.

यावेळी चक्क '९ वाजता कोर्टात या' असा फोन आला आणि मी उत्साहाने कोर्टात पोहोचले.

दरवाजालगत सिक्यूरिटी चेक, मेटल डिटेक्टर इत्यादी सोपस्कार पार पडल्यावर एका मठ्ठ चेहेऱ्याच्या गणवेषधारी गार्डाने मला एका मोठ्ठ्या दालनात नेलं.

त्या दालनाच्या दोन भिंती पूर्णपणे काचेच्या खिडक्यांच्या होत्या. मी आत आले त्या दरवाजाच्या दुसऱ्या टोकाला एक मोठ्ठा दरवाजा होता. ते दालन गोल टेबलांनी भरलेलं होतं. प्रत्येक टेबलाभोवती सहा खुर्च्या होत्या. बहुतेक टेबलांवर चुळबुळ करत व हळूहळू बोलत स्त्रीपुरुष बसलेले होते. उरलेल्या दोन मोकळ्या टेबलांपैकी एकासमोरची

खुर्ची गार्डने माझ्यासाठी मागे ओढली व तो परत गेला. बराच वेळ मी एकटीच होते. मग गार्ड एका चिनी मुलीला घेऊन आला. तो येताच अख्ख्या हॉलची नजर तिच्यावर स्थिरावली.

ती मुलगी एखाद्या बाहुलीसारखी सुंदर होती! मध्यम उंची, गोल चेहरा, मोठ्ठे काळे डोळे, त्यावर ओथंबलेल्या पापण्या, रेखीव कमानदार भुवया, नितळ गोरी कांती, अपरं नाक, कमनीय बांधा, खांद्यावर रुळणारे केस!!

गार्डने तिला माझ्या डाव्या बाजूच्या खुर्चीवर बसवलं. बसता बसता ती म्हणाली, "हॅलो, माझं नाव सूझन!"

"मी शीला" मी सांगितलं.

"मला ही जूरी ड्यूटी अगदी नको आहे." ती म्हणाली. "माझं नाटक चालू आहे."

"तू ॲक्ट्रेस आहेस?" मी विचारलं.

"हो. मी नाटकात काम करते. सिनेमात मिळतं का बघते आहे." मग ती सरळ मुद्यावर आली. "तू आधी कधी जूरी ड्यूटी केली आहेस का?"

"नाही." मी म्हटलं.

"मला थोडी भीतीच वाटतेय." ती बोलली.

दरवाजा उघडला आणि गार्ड एका तरुणाला घेऊन आला. उंच, निळ्या डोळ्यांचा, सोनेरी केसांचा तो तरुण एखाद्या ग्रीक पुतळ्यासारखा दिसत होता. पूर्ण हॉलची नसेल पण हॉलमधल्या बायकांची नजर त्याच्यावर खिळलीच! गार्डने माझ्या उजव्या बाजूची खुर्ची त्याला दिली. त्या दोघांमधे मी गालबोट लावल्यासारखी दिसत होते.

"हाय. मी रॉन." तो म्हणाला. "मला ही जूरी ड्यूटी करायला अजिबात वेळ नाही. मी प्रबंध लिहितोय."

"कश्यावर?" मी विचारलं.

"मी मॉलिक्यूलर बायॉलजीत पीएच.डी. करतोय."

"मलापण वेळ नाही." सूझनचा आवाज आणखीनच गोड झाला होता. "मी नाटकात कम करते आहे"."

"कुठल्या?"

तिने नाटकाचं नाव सांगितलं. आम्ही दोघांनी आपापल्या सेलफोनमधे त्याची नोंद केली.

"रात्री नाटक, दिवसा जूरी ड्यूटी! मी दमून जाईन!" सूझन म्हणाली.

"तुम्ही कधी जूरी ड्यूटी केली आहे?" रॉननेपण तोच प्रश्न विचारला. आम्ही दोघींनी एकदमच 'नाही' म्हटलं.

आता गार्ड आणखी एका तरुण मुलीला घेऊन आला. 'हिरवे डोळे, उभट चेहेरा, कुरळे केस, उंच सडपातळ बांधा!' परत सगळ्यांची नजर आमच्या दिशेला वळली. आमच्या टेबलावर 'सुंदर स्त्रीपुरुषांचं प्रदर्शन भरतंय' अशी शंका मला येऊ लागली.

या सुंदरीने बसता बसताच तक्रारी करायला सुरवात केली, "मी जूरी ड्यूटीवर गेले तर माझं काम कोण करणार?"

"कसलं काम?" सूझनने विचारलं.

"केस कापायचं? मी हेअर ड्रेसर आहे! माझं नाव सोफी."

सर्वांनी आपली नावं सांगितली. एवढ्यात गार्ड एका स्थूल, मध्यमवयीन, बुटक्या, तपकिरी आणि पिकलेल्या केसांच्या बाईला घेऊन आला. त्याने तिला रॉनशेजारी बसवलं. ती येताच आमच्या टेबलाला दोन गालबोटं लागली.

"हाय्, हाय् अँड हाय्! मी मेरी. मला जूरी ड्यूटी नको आहे. माझे सॅण्डविच शॉप कोण चालविणार?"

"तुमच्यापैकी कुणी जुरी ड्युटी केलीय?" मदनाच्या पुतळ्याने विचारलं.

"नाही." आम्ही सर्वांनी म्हटलं. एकटी मेरी बोलत राहिली, "मी स्वतः जूरी ड्यूटी केली नाही पण जूरी ड्यूटी केलेले दोघेजण मला माहीत आहेत."

"किती दिवस लागतात?" सूझनने विचारलं.

"ते केसवर अवलंबून असतं." मेरी म्हणाली, "मारामारी, शारीरिक इजा, खून, बलात्कार असं काही असलं तर बरेच दिवस लागतात.. ग्रँड जूरीवर नेमणूक झाली तर दोन तीन महिने लागू शकतात."

हे संभाषण चालू असताना , गार्ड एका राकट, हाताला घट्टे पडलेल्या, जीन व स्वेटशर्ट घातलेल्या मध्यमवयीन माणसाला घेऊन आला. आमच्या टेबलावरची शेवटची खुर्ची भरली.

त्या नवागताने टेबलावरून नजर फिरवली आणि म्हणाला, "Lucky me! Nice table!" कुणी काहीच बोललं नाही. फक्त मेरीने त्याच्याकडे वैतागलेला दृष्टीक्षेप टाकला. मग तो पुन्हा बोलू लागला, "I am Joe. This jury duty is going to flood many basements and block toilets!"

आता मीपण वैतागले. "Tell the lawyers that! They will let you go." मी म्हणाले, "Jury duty is our civic duty."

मेरी म्हणाली, "या गावात बरेच प्लंबर आहेत."

"I am the best!" जो म्हणाला आणि खिशातून स्वतःची कार्डं काढून सर्वांना वाटली. मेरीने तोंड वाकडं करत त्याचं कार्ड घेतलं.

आता टेबलावर दोघादोघांत संभाषण सुरू झालं. रॉन सूझनला, "तू नाटकात कधीपासून काम करतेयस?" म्हणून विचारू लागला तर मी मेरीला, "तू चिकन सॅलड कसं करतेस?" म्हणून विचारू लागले. ती मला "चिकन सॅलडमधे ॲपलचे तुकडे, वॉलनट्स घाल" वगैरे सूचना देऊ लागली. सोफीपण मधेच काहीतरी बोलली. शेवटी मी उठले आणि सूझनला म्हणाले, "तू रॉनशेजारी बैस." तर सोफी उठली आणि ती माझ्याजागी आली. "रॉनला माझ्या जागी बसू दे!"

आता सूझन व रॉन शेजारी बसून गप्पा मारू लागले. मेरी, सोफी व मी चिकन सॅलड व नंतर ग्रिल्ड मशरूमविषयी बोलू लागलो. आता आम्ही शेजारी असल्यामुळे बोलणं सोपं झालं होतं. मेरीने मला व सोफीला "मझ्या दुकानात या, बेस्ट चिकन सॅलड करते." असं आमंत्रण दिलं आणि आपल्या दुकानाचा पत्ता दिला.

एव्हाना कोपऱ्यातला दरवाजा उघडला होता आणि त्या दरवाजालगतच्या दोन टेबलांवरची माणसं त्या दरवाजातून आत गुप्त झाली होती.

"माझ्याबरोबर सूझनच्या नाटकाला येशील का?" मेरीने विचारलं. "जरूर" मी म्हटलं.

गार्ड आत आला. त्याने पलीकडच्या दरवाजालगतच्या दोन टेबलांना सोडून इतरांना कॉफीकेक जाहीर केला. कॉफी घेताना कोर्टाची कायदेशीर हद्द, म्हणजे आत येताना लागलेले मेटल डिटेक्टर्स वगैरे ओलांडून, बाहेरच्या खुल्या

दुनियेत जायला परवानगी नव्हती. थोडक्यात, कोर्टातल्या महागड्या दुकानात कॉफी घ्यावी लागणार होती. हे कॉफीचे पैसे 'टॅक्स डिडक्टिबल आहेत का?' असा प्रश्न माझ्या मनात येऊन गेला.

मी, मेरी व सोफी कॉफी करायला उठलोच नाही. 'जो'पण बसून राहिला. फक्त मदन आणि रती एकमेकांना चिकटून त्या दालनाबाहेर पडले. हॉल जवळजवळ मोकळा झाला. दोन मिनिटे जो ने आमच्या दिशेने बघत जूरी ड्यूटी, कोर्ट सिस्टिम, लॉयर्स सर्वांचा उद्धार केला. आम्ही उत्तर देत नाही हे लक्षात आल्यावर तोही उठून गेला. आम्ही तिघी सँडविचेस, शाम्पू, हेअर कंडिशनर अशा फालतू बायकी चर्चा करत बसून राहिलो.

आता गार्ड बेपत्ता होता. कुणीतरी येऊन ती दोन थांबवलेली टेबलं उठवून बोलावून आतल्या गुहेत नेली.

वीस मिनिटांनी कॉफीब्रेक संपला. सगळे स्त्रीपुरूष परतले आणि आपापल्या टेबलांवर स्थानापन्न झाले. आणखी दोन टेबलांना बोलावणं आलं. मदनाबरोबर खुदखुदून रती परतली. आणि ती दोघंजण आपल्या खुर्च्यांवर बसून गुलुगुलू बोलत बसली. बाजूच्या टेबलांवरच्या दोन उतार वयाला लागलेल्या बयका त्यांच्या खुर्च्यांमागे येऊन उभ्या राहिल्या. एक डोळा मारत म्हणाली, "you make a handsome pair."

रॅान उर्फ मदनला काय बोलावं हे सुचेना. प्रसंगावधान राखून सूझन म्हणाली, "थँक्यू!" दुसरी बाई म्हणाली, "This is an interesting place to meet."

"Right." सूझन म्हणाली. प्लंबर मोठ्यांदा हसला.

त्या बायका परत गेल्या व आपल्या खुर्च्यांवर बसल्या. त्या गेल्यावर सूझन जराशी लाजली. मेरी मोठ्यांदा म्हणाली, "Busybodies."

रॅान व सूझन गप्प बसून राहिले. एव्हाना इतर टेबलांवरची माणसं भराभरा आत गुप्त होत होती. मेरीची, माझी व सोफीची शांपूचर्चा चालूच होती. मधेच सोफीने आपलं बिझिनेस कार्ड आम्हाला दिलं. मी आणि मेरीने तिला 'आम्ही तिच्या सलूनमधे येऊ' असं आश्वासन दिलं.

एव्हाना फक्त दोनच टेबलं उरली होती. आम्हाला आत बोलावणं आलं आणि आम्ही - मी उत्साहाने आणि इतर पाय खेचत उठलो. आता हॉल पूर्ण मोकळा झाला.

आम्हाला गार्डने टोकाच्या दरवाजातून दुसऱ्या मोठ्ठ्या दालनात नेलं. तिथे मधे मोकळी जागा व दोनतीन खुर्च्या होत्या. त्या जागेत हातात कागद घेतलेले , सुटाबुटातले दोन पुरुष उभे होते. दरवाज्याजवळच्या दोन भिंतीलगत काटकोनात बारा बारा खुर्च्या मांडल्या होत्या. आम्हाला एका बाजूला बसवलं. दुसऱ्या बाजूला, आमच्या आधी त्या दालनात आत गेलेल्या टेबलावरचे लोक बसले होते. आम्हाला आत जाता जाता एक फॉर्म भरायला दिला व त्यात नाव, तत्ता व उद्योगधंदा एवढी माहिती भरायला सांगितली.

मधे उभे असलेले सूटटायवाले बहुतेक आरोपी व प्रतिस्पर्धीचे वकील असावेत असा अंदाज मी केला. हातातले कागद वाचून, मधून मधून थोडा वाद घालून ते जूररची निवड करत होते.

माझी खुर्ची अगदी मधल्या चौकालगत होती. माझ्या खुर्चीजवळ उभं राहून दोन सुटाबुटातले तरुण बोलत होते. त्यातला एक, कुठल्या केससाठी जुरी निवडत आहेत, हे सांगत होता - 'एका अकरा वर्षाच्या मुलाने दुसऱ्या एका आठ वर्षांच्या मुलाला, शाळेत रिसेसमधे बरंच मारलं, म्हणून त्या आठ वर्षाच्या मुलाच्या आईने तिसऱ्याच एका चवदा वर्षांच्या मुलाला पैसे दिले आणि त्या अकरा वर्षांच्या मुलाला बदडायला सांगितलं. त्या प्रमाणे त्या चवदा वर्षांच्या मुलाने, शाळा सुटल्यावर अकरा वर्षांच्या मुलाला ठोकलं, तो मुलगा दगडावर आपटला. त्याला खोक पडली आणि टाके घालावे लागले. मात्र त्या चवदा वर्षांच्या मुलाला शिक्षकांनी शाळेबाहेरच पकडलं. तेव्हा त्याने, 'आठ वर्षाच्या मुलाच्या आईने पैसे दिले  म्हणून अकरा वर्षाच्या मुलाला मारलं' हे कबूल केलं. अकरा वर्षांच्या मुलाच्या आईवडिलांना हे समजताच त्यांनी आठ वर्षांच्या व चवदा वर्षांच्या मुलांच्या आईवडिलांवर पैशासाठी, म्हणजे औषधोपचाराचा खर्च, मानसिक त्रास इत्यादीसाठी नुकसान भरपाईची केस केली होती. ते बरेच पैसे मागत आहेत." हे बोलणारे शिकाऊ विद्यार्थी असावेत असा मी अंदाज केला.

एव्हाना ही केस ऐकून माझं डोकंच गरगरायला लागलं होतं आणि माझी जूरीवर काम करायची इच्छा मावळू लागली होती.

ही कथा संपता संपता दुसऱ्या बाजूच्या खुर्च्या मोकळ्या झाल्या आणि आम्हाला त्या खुर्च्यांवर बसवलं.

दोन्ही लॉयर्सनी आमच्या कळपावरून नजर फिरवली. एकमेकाशेजारी बसलेल्या रती/मदनावर ती क्षणभर स्थिरावली, मग ते हातातले कागद चाळू लागले. आम्ही सगळे श्वास रोखून 'पुढे काय होणार?' याची वाट बघू दागलो.

प्रत्यक्षात जूरी निवडायला वेळ लागला नाही. रॉन, सूझन, प्लंबर, सोफी व मी .... आम्हा सर्वांना फटाफटा डच्चू मिळाला. "You may go." सगळे आनंद लपवत चटकन बाहेर पडले. मी पर्स चाळवत मेरीचं काय होतं ते बघायला बसून राहिले. शेवटी मला जावंच लागलं. तेव्हा मेरी कडवट चेहरा करून बसून होती.

मी बाहेर आले तेव्हा तो मठ्ठ चेहेऱ्याचा गार्ड  नव्हता. त्याची जागा एका तिशीतल्या, हसऱ्या बाईने घेतली होती. ती माझ्याकडे पाहून हसली. "So you are free now1" असं म्हणाली. मी तिला 'बाय' म्हणून बाहेर पडले.

समोरच्या रेस्टॉरंटमधे रॉन आणि सूझन लंच गेत होते. मी 'हाय' म्हणून हात उंचावला, पण त्यांचं लक्षच नव्हतं. ते एकमेकात गुंतले होते. मला त्यांचा थोडा हेवाच वाटला.

घरी गेल्यावर मी माझ्या कुटुंबियांना केस कशाबद्दल होती हे सांगितलं. प्रत्येकाने आपापलं मत दिलं. नवरा म्हणाला, "मुलं भांडतात, मारामाऱ्या करतात. बायकांना मुळी अक्कलच नसते. मुलांच्या भांडणात पडतात!"

मुलगा म्हणाला, "अकरा वर्षाच्या 'बुली'ला असंच मारलं पाहिजे. आठ वर्षाच्या मुलाला झोडपतो!! Pick on kids your own size."

मुलगी म्हणाली, "सगळेच मुलगे मूर्ख असतात. त्यांना मारामारी करायची असते. कारणच शोधत असतात."

एका महिन्याने मी मेरीला भेटायला गेले. तिने माझं चक्क मिठी मारून स्वागत केलं. मला फुकटात चिकन सॅलड सॅण्डविच मिळालं. मी तिला विचारलं, "जूरी ड्यूटीचं काय झालं?"

तिने सांगितलं, "मला जूरीसाठी निवडलं. सहा बायका आणि सहा पुरुष होते. केस एकच दिवस चालली आणि कोर्टाबाहेर सेटल झाली. किती पैसे दिले ते समजलं नाही."

थोडक्यात जूरी निवडण्याचा खटाटोप व्यर्थ!

मग आम्ही दोघी सूझनचं नाटक बघायला गेलो. सूझन ऑपेरा सिंगर होती. स्टेजवर आणखीनच सुंदर दिसत होती. मला ऑपेरा आवडत नाही पण सूझनचं नाटक आवडलं. नाटक संपल्यावर आम्ही स्टेजमागे जाऊन सूझनला

भेटलो. तिनेही आम्हा दोघींना मिठीच मारली. जूरी ड्यूटीला आमंत्रण हा एक तणावग्रस्त अनुभव होता. 'जूरी ड्यूटी केली नाही, फक्त इंटरव्ह्यूला गेलो' एव्हढाच अनुभव मैत्री होण्यासाठी पुरेसा होता.

"नाटक चांगलं झालं." एवढं सूझनला सांगून आम्ही बाहेर पडलो. खरं तर 'सूझन आणि रॉनची मैत्री टिकली की नाही' हा शोध मला लावायचा होता. तसा प्रश्न सूझनला विचारायची हिंमत मला झाली नाही. पण थिएटरच्या बाहेरच रॉन भेटला. " Dating Susan?" मेरीने विचारलं. "Yes" तो म्हणाला. "गुड लक." मी त्याला म्हटलं.

आणखी एक महिना उलटला. एका दुकानात मला कोर्टातली गार्डबाई भेटली. "हॅलो!" मी म्हटलं, "मी कोण आठवतंय का?"

ती म्हणाली, "हो. तुला कोर्टात जूररच्या इंटरव्ह्यूला बोलावणं आलं होतं ना?"

मी म्हटलं, "हो, पण त्यांनी मला निवडलं नाही. ते का?"

ती म्हणाली, "बहुतेक केसेसमधे  लॉयर्स शिकलेले जूरर टाळतात, कारण शिकलेली माणसं चिकित्सक असतात. लॉयर्सना सर्वसामान्य स्त्रीपुरुष जूरर म्हणून हवे असतात. मध्यमवर्गीय किंवा कनिष्ट मध्यमवर्गीय असे."

"पुरुष की स्त्री? यापैकी त्यांना कोण हवं असतं?"

"ते प्रत्येक केसवर अवलंबून असतं." ती म्हणाली. तिला "बाय, नाइस मीटिंग यू." म्हणून मी परत शॉपिंग करू लागले.

माझ्या आयुष्यात माझ्या अनेक महत्त्वाकांक्षा होत्या. त्यांना स्वप्नंच म्हणणं योग्य होईल. नटी व्हायचं, प्रसिद्ध नर्तिका व्हायचं, कॅन्सर बरा करणारं औषध शोधून काढायचं, बेस्ट सेलर पुस्तक लिहायचं, पुढारी होऊन जगाचे प्रश्न सोडवायचे वगैरे वगैरे. त्यातच, एखाद्या खटल्यात जूररचं काम करून निरपराध माणसाला सोडवायचं, हेही एक स्वप्न होतं. मधून मधून मी जागी होते आणि एकेका स्वप्नाला 'हे मला जपणार नाही' म्हणून तिलांजली देते.

तशी त्या दिवशी, जूररचं काम करून निरपराध माणसाची खोट्या आरोपातून सुटका करायची' या स्वप्नालाही तिलांजली दिली.

पूर्वप्रसिद्धी : 'एकता' अंक १५५ /जुलै २०१७